# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०८.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०८.२०२६ ते २८.०८.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०८.२०२६ ते ०२.०९.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| २.४ | १२.० | ७.४ | ३.६ | ४.८ | ४.२ | ३.० | पाऊस (मिमी) | | ८ | ९ | ९ | ७ | ९ |
| २९.० | २६.० | २६.० | २७.० | २७.५ | २८.५ | २८.२ | कमाल तापमान (अं.से.) | | २९ | २८ | २८ | २७ | २७ |
| २१.५ | २१.६ | २१.५ | २२.० | २२.२ | २२.० | २२.२ | किमान तापमान (अं.से.) | | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | स. | ढग स्थिती (आकाश) | ६ | ६ | ७ | ८ | ८ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | | |
| ९८ | ९८ | ९७ | ९३ | ८८ | ९६ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८९ | ८९ | ८८ | ९० | ९० |
| ९७ | ८३ | ८३ | ८२ | ७५ | ७८ | ७६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ७२ | ७३ | ७३ | ७२ | ७४ |
| ५.३ | ३.० | ४.६ | ४.४ | ४.६ | ५.० | ४.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | १३ | १७ | १८ | १७ | १५ |
| नै. | नै. | प.नै. | प.नै. | वा. | वा. | प.नै. | स. | वाऱ्याची दिशा | प. | प. | प. | प. | प. |
| वा. | वा. | नै. | वा. | नै. | द.नै. | नै. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ३७.४ | ७९१.२ | ५५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २९, ३०,३१ ऑगस्ट आणि १ व २ सप्टेंबर रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर दरम्यान काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मध्य व पूर्व भागात २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबरदरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २ सप्टेंबर पर्यंत कमाल तापमान २७.० ते २९.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८८ ते ९०%, दुपारची सापेक्ष आद्रता ७२ ते ७४% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १३ ते १८ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २८ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. दिनांक ४ ते १० सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी. |
| संदेश | | ❖ जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागातील शेतकरी बंधूंनी जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी खरीप पिकांमध्ये आच्छादनांचा वापर करावा |
| भात | वाढीची अवस्था / फुटवे फुटणे | ➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी अधिक फुटव्याच्या अवस्थेत ३ ते ५ सें. मी. ठेवावी<br>➢ भात पिकासाठी रसायनिक खत मात्रा देण्यासाठी युरिया अर्धा किलो प्रती गुंठा या प्रमाणात द्यावा (२५ ते ३० दिवसानी)<br>➢ फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड २ याची ४० मिलि प्रती पंप याप्रमाणात फवारणी करावी (२५ दिवसानी)<br>➢ पुर्नलागवडीनंतर खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून येताच म्हणजे साधारणत: ५ टक्के कीडग्रस्त काड्या किंवा सरासरी एक अंडीपुंज प्रति चौ.मी. शेतात आढळून आल्यास फिप्रोनिल ५ एस.सी. २० मि.ली. किंवा फ्ल्युबेन्डॅमाईड ३९.३५ एस.सी. १.० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. खोडकिडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा जापोनिकम या प्रजातीचे १ लाख प्रौढ प्रति हेक्टर आठवड्याचे अंतराने पीक लागवडीनंतर एक महिन्यांनी चार वेळा प्रसारित करावे.<br>➢ पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास क्लोरॅनट्रॅनिलीप्रोल १८.५ एस.सी. ३.० मि.ली. किंवा फ्ल्युबेन्डॅमाईड ३९.३५ एस.सी. १.० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| नाचणी | वाढीची अवस्था | ➢ नाचणी पिक सध्या जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. नत्राचा दुसरा हफ्ता दिला नसल्यास पिकामध्ये खुरपणी/ कोळपणी करून द्यावा.<br>➢ पानावरील करपा असल्यास कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रती लीटर पाणी याप्रमाणात अथवा पाने खाणाऱ्या अळी, खोड माशी प्रादुर्भाव दिसल्यास आंतरप्रवाही कीडनाशकांची फवारणी करावी.<br>➢ फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड २ याची ५० मिलि प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात मिसळून फवारणी करावी |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ पिक तणविरहित ठेवावे. |
| मका | शाकिय वाढ | ➢ मध्य व पूर्व भागातील शेतकरी बांधवांनी पीक फुलोऱ्यामध्ये येण्यापूर्वी संरक्षित पाणी द्यावे<br>➢ मका पेरणीस पेरणीनंतर ३० दिवस झाले असल्यास नत्र खताचा हप्ता देण्यासाठी युरिया ३५ किलो प्रती एकरी या प्रमाणात द्यावा<br>➢ मका पेरणीस ४० दिवस झाले असल्यास फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड २ याची ५ ते ७ मिलि प्रती पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ मक्याच्या मध्यम ते शेवटच्या पोंगा या वाढीच्या अवस्थेत लष्करी अळीचा १० ते २०% प्रादुर्भाव आढळल्यास खालीलपैकी एका कीटकनाशकाचा आलटून पालटून वापर करावा. ( प्रमाण प्रति १० लिटर पाणी)<br>➢ १. आयसोसायक्लोसिरम १८.१% एस सी (६ मिली) किंवा<br>➢ २. स्पीनेटोरम ११.७% एस सी (५ मिली) किंवा<br>➢ ३. ब्रोफ्लानीलीड २०.०% एस सी (२.५ मिली) किंवा<br>➢ ४. फ्लूबेनडायअमाईड २०.०% डब्लू जी (५ ग्रॅम) किंवा<br>➢ कीटकनाशकांचा वापर चारा पिकावर करू नये. प्रतीक्षा कालावधीचे पालन करावे. |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ सुरू ऊसास २% युरिया किंवा २ % डी.ए.पी. किंवा २ % १९:१९:१९ यापैकी एक फवारणी घ्यावी<br>➢ आडसली ऊस लागवडीस ६ ते ८ आठवडे झाले असल्यास युरिया १३९ किलो प्रती एकर याप्रमाणात द्यावा<br>➢ मागील आठवड्यामध्ये वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी तपकिरी ठिपके व तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२ % + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% १० मिलि प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ लव्हाळा व रुंद पानांची तणे उदा. केणा, दुधाणी,कुंजरू, घोळ, गाजर गवत यांच्या नियंत्रणासाठी आडसाली उस लागवडीस १५ ते २० दिवस झाले असल्यास १२ ग्रॅम मेटसल्फ्युरॉन मिथील २० % डब्ल्यु. पी. ३० ग्रॅम प्रती हेक्टर या प्रमाणात तणनाशकामध्ये नॉन आयोंनिक सरकेक्टंट मिसळून पाकीटावर लिहीलेल्या पद्धतीनुसार फवारणी करावी<br>➢ आडसली लागवड केली असल्यास आणि काही ठिकाणी गॅप आढळून आल्यास रोपवाटीकेमधील रोपांच्या सहाय्याने नांग्या भरून घ्याव्यात. |
| सोयाबीन | शाकिय वाढ/ फुलोरा | ➢ पेरणीनंतर ६० ते ६५ दिवस झाले असल्यास फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड दोन ५ मिलि प्रती लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी<br>➢ काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस, कमाल तापमानातील वाढ आणि वाढलेली आद्रता यांमुळे पाने खाणारी अळीचा (स्पोडोप्टेरा) प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना कराव्यात<br>➢ आर्थिक नुकसान पातळी: १० अळया/मीटर ओळीत पीक फुलोऱ्यात येण्यापूर्वी<br>➢ प्रतिबंधात्मक उपाय: पिकामध्ये हेक्टरी ५ याप्रमाणे स्पोडोप्लुरचा वापर करून फिरोमोन सापळे लावा<br>➢ नियंत्रण: फ्लूबेंडामाईड २० % डब्लू.जी. ६ ग्रॅम अथवा फ्लूबेंडामाईड ३९.३५% एसी ३ मिली अथवा इंडोक्झाकार्ब १५.८० % ई.सी. ६ मिली अथवा स्पिनेटोरम ११.७०% एस.सी. १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.<br>➢ मध्य व पूर्व भागातील शेतकरी बांधवांनी संरक्षित पाण्याची उपलब्धता करावी |
| भुईमूग | वाढीची अवस्था | ➢ सततचा पाऊस आणि हवेतील जास्त आद्रता यामुळे भुईमुग पिकावर टिक्का आणि तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फ्ल्यूबेनडॅमाईड ३.५% + हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यू. जी. २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | फळधारणा | ➢ मागील आठवड्यामद्धे ढगाळ आणि हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने टोमॅटो पिकावर करपा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी मॅन्कोंझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम किंवा अॅझॉक्झीस्ट्रोबीन १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून २ ते ३ फवारण्या आलटून पालटून कराव्यात. |
| वांगी | फळधारणा | ➢ ढगाळ हवामानामुळे पांढरी माशी या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी शेतामध्ये चिकट सापळे एकरी २० ते २५ या प्रमाणात लावावेत. |
| पशुधन | वाढीची | ➢ गाभण गायींना अतिरिक्त १ किलो खुराक गर्भधारणेच्या ८ व्या महिन्यापासून तसेच म्हशींना अतिरिक्त १ किलो खुराक गर्भधारणेच्या ९ व्या महिन्यापासून द्यावा<br>➢ म्हशी, गाई, शेळया व मेंढया यांमध्ये तज्ञ पशूवैद्यकाच्या सल्ल्याने जंतनिर्मूलन करून घ्यावे<br>➢ प्रत्येक गायीला दररोज ५० ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे. |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २८.०८.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा
सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर